2 7 JUN 2021

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# फुले, शाहू, आंबेडकरांच्या मार्गानेच राष्ट्रीय एकात्मतेची जोपासना

## डॉ. जयसिंगराव पवार : शिवाजी विद्यापीठात ऑनलाईन व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : देशाची एकता, अखंडता, बंधुता जोपासायची तर फुले, शाहू, आंबेडकर यांनी आखून दिलेल्या मार्गावरूनच चालावे लागेल, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत व इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी केले. स्वातंत्र्यप्राप्तीला पाऊणशे वर्षे झाली तरी अद्यापही आपल्यातला भेदभाव, अज्ञान, परस्परांमधला कटुताभाव दूर होऊ शकलेला नाही. परस्परद्वेषाच्या पायावर कोणतेही राष्ट्र उभारू शकत नाही. आपल्यातले भेद जितक्या लवकर दूर होतील, तितके एक राष्ट्र म्हणून आपण मजबूत होऊ, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

शाहू जयंतीचे औचित्य साधून शिवाजी विद्यापीठाच्या वतीने 'राजर्षी शाहू महाराज आणि राष्ट्रीय एकात्मता' या विषयावर आयोजित विशेष ऑनलाईन व्याख्यानामध्ये ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. प्रकुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित होते.

डॉ. पवार म्हणाले, राजर्षी शाहू महाराजांनी त्यांच्या हयातीमध्ये जे राजकीय, सामाजिक योगदान दिले, त्या कार्याची व्याप्ती पाहता, ते खऱ्या अर्थाने राष्ट्रबांधणीचे, राष्ट्रउभारणीचे कार्य होते. ते पुढे नेण्याचे त्याला घटनेच्या साच्यात आकार देण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. आज त्या कार्याला आव्हान देण्याचे घातक प्रयत्न होत आहेत.



मुख्य प्रशासकीय इमारत व राजर्षी शाहू संशोधन केंद्रामध्ये कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्रकुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी राजर्षी छत्रपती शाहू महाराजांना अभिवादन केले. यावेळी ज्येष्ठ विचारवंत व शाहू संशोधन केंद्राचे मानद संचालक डॉ. जयसिंगराव पवार, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर उपस्थित होते.

### सामूहिक शहाणपणा वाढावा

राष्ट्र टिकवायचे असेल, तर आपण सर्व धर्मांचे आहोत, ही भावना दृढमूल होणे आवश्यक आहे. भावना भडकावणाऱ्या प्रवृत्तींपासून दूर राहावयाचे असेल, तर स्वतः शहाणे होणे आवश्यक आहे आणि त्यासाठी शिक्षण हाच एकमेव उपाय आहे. महात्मा फुले यांच्यापासून कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यापर्यंत बहुजन समाजाच्या हरेक नेतृत्वाने समाजाचा सामूहिक शहाणपणा कसा वाढेल, याकडे लक्ष केंद्रित केलेले होते. या सामूहिक शहाणपणाच्या व्याप्तीवरच देशाचे शहाणपण, देशाचा सर्वधर्मसमभाव या गोष्टी अवलंबून असतात, असेही डॉ. पवार म्हणाले.

आपले राष्ट्र हे कोण्या एका धर्माचे नसून सर्व धर्मीयांचे आहे, अशी समभावाची भावना जोपासली जाणे, वृद्धिंगत होणे ही महत्त्वाची बाब आहे.

अध्यक्षस्थानावरून बोलताना कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, समाजातील सर्व घटकांच्या कल्याणाचा विचार हा राजर्षी शाहूंच्या कार्याचा पाया होता. प्रत्येक घटकासाठी त्यांनी दूरगामी ठरणारे निर्णय घेतले. शिक्षण, कला, संगीत, शेती, सहकार, जलसिंचन, क्रीडा अशा सर्वच क्षेत्रांच्या विकासासाठी त्यांनी दिलेले योगदान राष्ट्रनिर्मितीचेच कार्य आहे. प्रकुलगुरू डॉ. पी.एस. पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले. जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी सूत्रसंचालन केले.

जनसंपर्क कक्ष
2 7 JUN 2021 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# लघुपटातून साकारली ऐतिहासिक माणगाव परिषद

## मुख्यमंत्र्यांच्या हस्ते ऑनलाईन लोकार्पण

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या कोल्हापूर जिल्हा माहिती कार्यालय निर्मित 'माणगाव परिषद-१९२०' या लघुपटाचे ऑनलाईन लोकार्पण सामाजिक न्यायदिनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आले. हा ऐतिहासिक ठेवा या लघुपटाच्या माध्यमातून जनतेसमोर आणल्याबद्दल मुख्यमंत्र्यांनी शुभेच्छा दिल्या.

ऑनलाईन लोकार्पण सोहळ्यास उपमुख्यमंत्री अजित पवार, सामाजिक न्यायमंत्री धनंजय मुंडे, ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ, पालकमंत्री सतेज पाटील, माहिती व जनसंपर्क राज्यमंत्री आदिती तटकरे, सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री राजेंद्र पाटील-यड्रावकर, सामाजिक न्याय राज्यमंत्री विश्वजित कदम, शाहू छत्रपती महाराज, राज्य वित्त आयोगाचे कार्यकारी अध्यक्ष राजेश क्षीरसागर, उर्वरित वैधानिक विकास महामंडळाचे अध्यक्ष डॉ. योगेश जाधव, खा. संभाजीराजे छत्रपती, खा. संजय मंडलिक, खा. धैर्यशील माने, जिल्हाधिकारी दौलत देसाई यांच्यासह जिल्ह्यातील आमदार ऑनलाईन सहभागी झाले होते.

लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या उपस्थितीत माणगावमध्ये १९२० साली झालेल्या परिषदेला १०१ वर्षपूर्ती निमित्ताने हा लघुपट प्रतीकात्मक स्वरूपात तयार केला आहे. या लघुपटासाठी जिल्हाधिकारी देसाई यांच्या अध्यक्षतेखाली समिती कार्यरत होती. ज्येष्ठ विचारवंत आणि इतिहासतज्ज्ञ डॉ. जयसिंगराव पवार, ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर, इतिहास संशोधक इंद्रजित सावंत, शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता आणि संवादशास्त्र विभागप्रमुख डॉ. निशा मुडे, विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांचा या समितीत समावेश होता. पुण्याच्या रिडिफाईन कॉन्सेप्ट्स संस्थेचे योगेश देशपांडे यांनी याची निर्मिती-दिग्दर्शन केले आहे. या निर्मितीत प्रशांत सातपुते यांच्यासह जिल्हा माहिती कार्यालयातील कर्मचाऱ्यांनीही योगदान दिले. या लोकार्पण प्रसंगी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे संचालक गणेश रामदासी, गोविंद अहंकारी यांनी स्वागत केले. महासंचालक डॉ. दिलीप पांढरपट्टे यांनी प्रास्ताविकात लघुपटनिर्मितीमागील पार्श्वभूमी सांगितली. मुख्यमंत्री कार्यालयाचे मुख्य जनसंपर्क अधिकारी अनिरुद्ध अष्टपुत्रे यांनी आभार मानले.

27 JUN 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# फुले, शाहू, आंबेडकरांच्या मार्गानेच राष्ट्रीय एकात्मता शक्य

## डॉ. जयसिंगराव पवार : शिवाजी विद्यापीठातर्फे शाहू जयंतीनिमित्त ऑनलाईन व्याख्यान



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे शाहू जयंतीनिमित्त आयोजित ऑनलाईन कार्यक्रमात 'राजर्षी शाहू महाराज आणि राष्ट्रीय एकात्मता' यावर बोलताना डॉ. जयसिंगराव पवार.

कोल्हापूर, ता. २६ : "राष्ट्राची एकता, अखंडता, बंधुता जोपासण्यासाठी फुले, शाहू, आंबेडकर यांनी आखून दिलेल्या मार्गावरूनच चालावे लागेल," असे प्रतिपादन इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी केले. शिवाजी विद्यापीठातर्फे राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त 'राजर्षी शाहू महाराज आणि राष्ट्रीय एकात्मता' यावर विशेष ऑनलाईन व्याख्यान झाले. विद्यापीठाच्या 'शिव-वार्ता' यू-ट्यूब वाहिनीवरून प्रसारित झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील उपस्थित होते.

डॉ. पवार म्हणाले, "शाहू महाराजांनी त्यांच्या हयातीत जे राजकीय, सामाजिक योगदान दिले, त्या कार्याची व्याप्ती पाहता, ते खऱ्या अर्थाने राष्ट्रबांधणीचे, राष्ट्र उभारणीचे कार्य होते. पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांच्या बांधणीला घटनेच्या साच्यात सुस्वरूप आकार देण्याचे कार्य केले. आज त्या कार्याला आव्हान देण्याचे घातक प्रयत्न होत आहेत. आपले राष्ट्र हे कोण्या एका धर्माचे नसून सर्व धर्मीयांचे आहे, अशी समभावाची भावना जोपासली जाणे, वृद्धिंगत होणे महत्त्वाची बाब आहे. राष्ट्र टिकवायचे असेल तर आपण सर्व धर्मांचे आहोत, ही भावना दृढमूल होणे आवश्यक आहे. महात्मा फुले यांच्यापासून कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यापर्यंत बहुजन समाजाच्या प्रत्येक नेतृत्वाने समाजाचा सामूहिक शहाणपणा कसा वाढेल, याकडे लक्ष केंद्रित केले होते."

ते म्हणाले, "लोकशाहीवादी, मानवी मूल्यांवरच राष्ट्र ही संकल्पना आधारित आहे. राजकीय स्वातंत्र्य हे त्यातले एक मूल्य आहे. ती एक आवश्यकता आहे. मात्र केवळ तेच म्हणजे राष्ट्र समजणे गैर आहे. अद्यापही भेदभाव, अज्ञान, परस्परांमधला कटुता भाव दूर होऊ शकलेला नाही." प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी प्रास्ताविक केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले. जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी सूत्रसंचालन केले.

कार्यक्रमापूर्वी मुख्य प्रशासकीय इमारतीत, राजर्षी शाहू संशोधन केंद्रात कुलगुरू डॉ. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. डॉ. पवार, डॉ. नांदवडेकर, जी. आर. पळसे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, अधिष्ठाता डॉ. एस. एस. महाजन, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. एन. बी. गायकवाड, डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. अजित पाटील, डॉ. [illegible] पाटील, [illegible] आदी उपस्थित होते.

### सर्व घटकांचे कल्याण हा राजर्षींच्या कार्याचा पाया

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, "समाजातल्या सर्व घटकांच्या कल्याणाचा विचार हा राजर्षींच्या कार्याचा पाया होता. प्रत्येक घटकासाठी त्यांनी दूरगामी निर्णय घेतल्याचे दिसते. शंभर वर्षांपूर्वी प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत करण्याच्या आणि त्याचा लाभ समाजातल्या सर्व घटकांपर्यंत पोहोचविण्यासाठी धडपडणाऱ्या या लोकराजाच्या द्रष्टेपणाचे कौतुक वाटते."